जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२८/०५/२०२३
## दि.२७/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३५५/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय २१ वर्षे,रा.पोरवाल रोड लोहगांव,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २६/०५/२०२३ रोजी रात्री ११/३० वा.विमाननगर रोड,बारबीक्यु व्हिले जवळ,कल्याणीनगर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे मैत्रीणीसह दुचाकीवरून जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील आय.फोन मोबईल २५,०००/- रू किमतीचा जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. स्वप्नाली गायकवाड ७७०९१३०९१७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ४१४/२०२३,भादविक ३०४(अ),२७९,३३७,३३८,४२७,मो.वा.का.क.१८४,१३४/१७७,११९/१७७ |
| **फिर्यादी** | ओम लोणकर,वय-२१ वर्षे,रा-१०५, ओमकार सेरेनिटी,वाघोली,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०५/२०२३ रोजी रात्रौ २२/३० वा.लोणीकंद केसंनद रोडवरील एच.पी. पेट्रोल पंपा जवळ |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे चालवत असलेली मोटार सायकल हिस कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन, नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे दुचाकीला पाठीमगुन जोरात धडक दिली. त्यानंतर फिर्यादी यांची दुचाकी स्लीप होवुन,अंधारात उभ्या असलेल्या चार-चाकी वाहनास जावुन जोरात धडकल्यामुळे फिर्यादी यांचा मित्र अथर्व दत्तात्रय गजरे,वय-२० वर्षे,रा.राधेश्वरी नगर,बकोरी रोड वाघोली,ता.हवेली,जि.पुणे यास गंभीर दुखापत होवुन तो मयत झाला आहे. तसेच सदर अपघाता मध्ये फिर्यादी यांचा डावा हात व उजवा पाय फ्रॅक्चर झाला असुन,त्याचे मोटार सायकलचे नुकसान झाले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. दिपक जाधव ८१०८९६६००९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे १६७/२०२३,भादविक ३०८,३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३)सह १३५ |
| **फिर्यादी** | धिरेंद्र चौहान,वय-२७ वर्षे,रा.धायरकर कॉलनी,मुंढवा,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/०५/२०२३ रोजी रात्रौ ०२/१५ वा.ताडीगुत्ता चौका जवळ,एबीसी रोड,मुंढवा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र विक्रम उदाईन,रा.आसाम राज्य याचेसह त्यांचे हॉटेल मधील वेटरचे काम संपवुन राहते घरी धायरकर कॉलनी मुंढवा,पुणे येथे पायी जात असताना,नमुद ठिकाणी त्यांचे पाठीमागुन आलेल्या मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसमांनी संगनमत करून,फिर्यादी यांचे जवळ येवुन,"क्यु रे, हमको एन्ट्री नही दे रहे थे,तब तु क्यु हस रहा था" असे म्हणुन,त्यांचेकडील धारदार हत्याराने फिर्यादी यांचे दोन्ही हातावर,डोक्यावर व पाठीवर वार करून सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जोरे ९४०३५४७५०१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २३३/२०२३,भादविक ३०६,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-५० वर्षे,रा.सर्वे नं २३/1 आनंद विहार हिंगणे खुर्द सिंहगडरोड पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याची पत्नी (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०४/२०२३ रोजी सकाळी ०९/०० वा. ते १९/०० वा.चे दरम्यन सर्वे नं.२३/१,आनंद विहार,हिंगणे-खुर्द सिंहगड रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | सिंहगड पो स्टे अ.मयत रजि.नं.४९/२०२३,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील फिर्यादी यांचा मुलगा,वय-२४ वर्षे,रा.सर्वे नं.२३/१,आनंद विहार, हिंगणे-खुर्द सिंहगड रोड,पुणे याने फिर्यादी याचे घराचे शेजारी राहणारे एक इसम व त्याची पत्नी यांनी फिर्यादी यांचे घराला लागुन असलेले त्यांचे घराचे बांधकाम सुरु करुन,त्यासाठी जाण्या-येण्यासाठी लागणारा फिर्यादी व नमुद इसम यांचे पुर्वी सामाईक असलेला लोखंडी जिना काढुन,तेथे सिमेंटचा जिना बांधण्यावरुन फिर्यादी व त्यांची पत्नी तसेच मुलगा मनोज यांनी त्यास विरोध केल्याचे कारणावरून त्यांनी संगनमत करून, मनोज दाभोळकर यास वेळोवेळी मानसिक त्रास देवुन "आम्ही तर जीना बांधणारच आहे, तुला काय करायचे ते तु कर" असे वारंवार बोलुन मनोज दाभोळकर यास वेळोवेळी त्रास दिल्यामुळे, त्यास त्रास सहन न झाल्याने त्याने दि.१०/०४/२०२३ रोजी सदर इसम व महिला यांचे त्रासाला कंटाळुन, काथ्या दोरीच्या साहयाने गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. किशोरी साबळे ९०२८३९४४९६ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे १४१/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ५५ वर्षे,रा.मु.पो.तोंडोले,ता.कडेगाव,जि.सांगली |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०५/२०२३ रोजी दुपारी ०१/४५ वा.स्वारगेट बस स्टॅण्ड मध्ये कवठे महाकाळ ते स्वारगेट बस मधुन खाली उतरत असताना,बसचे दरवाज्या जवळ स्वारगेट एस.टी.स्टॅण्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया स्वारगेट बस स्टॅन्ड मध्ये कवठे महाकाळ ते स्वारगेट बस मधुन खाली उतरत असताना,बसचे दरवाज्या जवळ,कोणीतरी अज्ञात इसमाने,बस मधील गर्दीचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे पर्स मधील १,१७,०००/- किमतीचे सोन्याचे दागिने सोन्याचे असलेली छोटी पर्स दागिन्यासह चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, प्रशांत संदे ०२०/२४४५२७६९ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे १६६/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | मंजुनाथ व्यंकटाचलाय,वय ३६ वर्षे,रा.औध रोड ,खडकी,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०१/०२/२०२३ रोजी ०५/३० वा.ते दि.०२/०२/२०२३ रोजी १५/०० वा.चे दरम्यान बोपोडी मेट्रो स्टेशन मेट्रो ट्रॅकच्या बाजुला बोपोडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे जेएमडीआर या कंपीनी मध्ये प्रोजेक्ट मॅनेजर या पदावर आहेत. फिर्यादी यांची कंपनी रेल्वेचे व मेट्रोचे सिग्नलिंगचे कॉन्ट्रॅक्ट घेवुन कामकाज घेतले आहे. त्यांचे काम हे सदर सिग्नलिंग करण्याकरीता लागणारे केबल व साहित्य याचे इंन्टॉलिग करतात. त्यांचे कंपनीचे सध्या खडकी ते रामवाडी पर्यंत सिग्नलचे कामकाज चालु असल्याने,सदर रेंजहिलस ते बोपोडी सिग्नलिंगसाठी फिर्यादी यांनी बसवलेली ६९,३५२/- रूपये किची कॉपर (तांब्याची वायर) पॉवर केबल २६० मीटरची चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस फौजदार, तानाजी कांबळे ९९२३१०११५२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**